शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत शासकीय मुद्रणालयात शिकाऊ उमेदवारांची प्रशिक्षण शिकाऊ उमेदवारांची पदे पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उदयोग उर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक शिकाऊ २०१७/प्र.क्र.११/उदयोग-४,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-१९ जानेवारी, २०१८

वाचा :- १) शासन निर्णय क्रमांक शिकाऊ २०१६/सीआर ११/उदयोग-४, दिनांक २४.११.२०१७.
२) संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.आस्था/ शि.ऊ. मु.वा./कार्या ४-अ-१०/२०१७-१८/३४१६, दिनांक २१.१२.२०१७.

शासन निर्णय :-

शासकीय मुद्रण व लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालयाच्या अधिपत्त्याखाली शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, नागपूर, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर आणि शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद या मुद्रणालयातील अनुक्रमे २७,१६,३१,२२ व २४ अशा एकूण १२० शिकाऊ उमेदवारांची अस्थायी पदे दिनांक ३१.१२.२०१७ पर्यत पुढे चालू ठेवण्यास दिनांक २४.११.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये यापूर्वीच मान्यता देण्यात आलेली आहे. आता पुढील तक्त्यात मुद्रणालय निहाय दर्शविल्याप्रमाणे एकूण १२० उमेदवारांची अस्थायी पदे दिनांक ०१.०१.२०१८ ते दिनांक २८.०२.२०१८ या कालावधीसाठी पुढे चालू ठेवण्यास या निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	शा.म.मु. मुंबई	शा. फो. मु.व ग्रं. पुणे	शा. मु.व ग्रं. नागपूर	शा. मु.व ले. भां. कोल्हापूर	शा.मु. औरंगाबाद	एकूण
१	पुस्तक बंधक	१०	११	१४	१०	१४	५९
२	प्लेट मेकर	--	२	१	६	१	१०
३	डी.टी.पी	८	--	४	--	२	१४
४	मशिन माईंडर	--	३	--	--	७	१०
५	लिथो ऑफसेट मशीन माईंडर	--	--	१२	६	--	१८
६	प्रतिरुप मुद्रण	७	--	--	--	--	७
७	प्रक्रिया	१	--	--	--	--	१
८	रिटचर	१	--	--	--	--	१
	एकूण	**२७**	**१६**	**३१**	**२२**	**२४**	**१२०**

२ वरीलप्रमाणे शिकाऊ उमेदवारांच्या प्रचलित आदेशानुसार प्रशिक्षणाचा आढावा घेण्यात यावा. तसेच सदर पदे पुढे चालू ठेवणे आवश्यक आहे किंवा कसे, याबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात यावा.

३ सदर १२० पदे उक्त कालावधीकरिता चालू ठेवण्यासाठी होणारा खर्च मागणी क्र.के-३, २०५८, लेखनसामग्री व मुद्रण (००) (८००) इतर खर्च (०१) शिकाऊ उमेदवारांचे प्रशिक्षण या मुख्य लेखाशिर्षाखाली संबंधित मुद्रणालयात सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी मंजूर करण्यात आलेलया अनुदानातून भागविण्यात यावा व तो त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११९१६४३३७४९१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Patil Karansing Premsing

Digitally signed by Patil Karansing Premsing
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6f2521c3a6d1f8429a3c2c9a42d575298ae82956908d63df441063695f377819, cn=Patil Karansing Premsing
Date: 2018.01.19 16:48:53 +05'30'

(क.प्रे.पाटील)
अवर सचिव

प्रति :-

१. संचालक, शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, मुंबई
२.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
३.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
५.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/कोल्हापूर/औरंगाबाद
६.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, पुणे
७.व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई
८.व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, पुणे
९.व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, नागपूर/कोल्हापूर/औरंगाबाद
१०.कक्ष अधिकारी, प्रशासन-१ उदयोग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११.निवड नस्ती, (उदयोग-४).